**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद**
**आयोजित,**
**शतकमहोत्सवी नाट्यसंमेलनानिमित्त, नाट्य जागर २०२४**
**राज्यस्तरीय खुली नाट्यसंगीत पद गायन स्पर्धा**
**स्पर्धेचे नियम व अटी-**

१. सदर स्पर्धा फक्त मराठी भाषेतच होईल. स्पर्धा प्राथमिक फेरी, उपांत्य फेरी व अंतिम फेरी ह्या स्वरूपात संपन्न होईल. ही स्पर्धा १५ वर्षापुढील सर्वांसाठी खुली असेल.

२. प्राथमिक फेरी – दिनांक २५ जानेवारी २०२४ ते दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ ह्या कालावधीत संपन्न होईल.

**ग्रुप १-**

१) रत्नागिरी (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग करिता) २) कोल्हापूर / बेळगाव ३) सांगली ४) सातारा ५) सोलापूर ६) पुणे ७) नाशिक

**ग्रुप २ –**

१) जळगाव २) धुळे / नंदूरबार ३) अहमदनगर ४) बीड ५) नांदेड / परभणी / हिंगोली ६) लातूर / धाराशीव ७) छत्रपती संभाजीनगर / जालना

**ग्रुप ३ -**

१) अकोला २) अमरावती ३) नागपूर ४) चंद्रपूर / गडचिरोली / भंडारा/ वर्धा ५) वाशीम / बुलढाणा / यवतमाळ ६) ठाणे ७) नवी मुंबई ८) मुंबई

**उपांत्य फेरी-**

नाशिक आणि सांगली येथे दिनांक ११ मार्च २०२४ ते २१ मार्च २०२४ ह्या कालावधीत संपन्न होईल.

**अंतिम फेरी –**

मुंबई येथे दिनांक १३ आणि १४ एप्रिल २०२४ ह्या कालावधीत संपन्न होईल.

३. प्राथमिक फेरी वरील केंद्रांवर घेण्याचा मानस आहे, परंतु प्रवेश अर्ज त्या त्या विभागानुसार किती येतील त्या संख्येवर वरील केंद्र कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार नाट्य परिषदेचा असेल.

४. प्रवेश अर्ज गुगलफॉर्म द्वारेच ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जातील. पोस्ट, मेल किंवा इतर कोणत्याही माध्यमातून पाठविलेल्या प्रवेश अर्जांचा विचार केला जाणार नाही. स्पर्धेची संपूर्ण माहिती www.natyaparishad.org ह्या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध आहे.

५ . ऑनलाइन अर्जासोबतच रू. १००/- प्रवेश फी भरावी लागेल. सदर प्रवेश शुल्क भरलेले आहे त्याचे विवरण अर्जावर दिलेल्या ठिकाणी भरून पाठवणे आवश्यक आहे.
जे स्पर्धक सादरीकरण करणार नाहीत. त्यांची प्रवेश फी रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही. तसेच प्रवेश अर्जावर प्रवेश शुल्क भरल्याची माहिती नसेल तर असे अर्ज स्पर्धेतून बाद केले जातील ह्याची नोंद घ्यावी.

६. स्पर्धेची प्राथमिक फेरी महाराष्ट्रातील आपल्या जवळच्या परंतु विभागवार परिषदेने ठरवून दिलेल्या केंद्रावरच संपन्न होईल. एका स्पर्धकास कोणत्याही एकाच केंद्रावर सहभाग घेता येईल. एक केंद्र सोडून दुसऱ्या केंद्रात सहभाग आढळून आल्यास संबंधित स्पर्धक स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

७) कोणत्याही संगीत नाटकातील पद गाता येईल.

८) नाट्य संगीत पद गाण्यासाठी तबला, पेटी व इतर आवश्यक ते वाद्यवृंद स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे. आयोजकांकडून कुठल्याही प्रकारची व्यवस्था केली जाणार नाही.

९) सादरीकरण वेळ किमान ७ मि. ते कमाल १० मिनिटे राहील.

१०) **पात्रता निकष -**

- प्राथमिक फेरीतून प्रत्येक केंद्रातून साधारण नऊ स्पर्धकांमधून एक स्पर्धक ह्या प्रमाणात उपांत्य फेरीसाठी स्पर्धक निवडण्यात येतील. ह्याबाबत परीक्षक आणि नाट्य परिषद जो निर्णय घेईल तो निर्णय अंतिम असेल. उपांत्य फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धकांची नावे दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी संकेतस्थळावर जाहीर केली जातील. तसेच निवड झालेल्या स्पर्धकांना भ्रमणध्वनी द्वारे कल्पना दिली जाईल.

११) उपांत्य फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धकांना उपांत्य फेरी केंद्र व तारीख नंतर कळविले जाईल.

१२) फक्त उपांत्य आणि अंतिम फेरीत पात्र ठरलेले स्पर्धक आणि वादक ह्यांच्या येण्या-जाण्याचा प्रवास खर्च म्हणून सांघिक रुपये १५/- प्रति किलोमीटर आणि प्रत्येकी रुपये १५०/- प्रमाणे भोजन/अल्पोपहार भत्ता रक्कम देण्यात येईल. प्रवासाचे अंतर पडताळणी करून ठरविण्यात येईल. नाट्य परिषदेने ह्याबाबतीत घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. प्राथमिक फेरीसाठी कुठल्याही प्रकारचा भत्ता वा प्रवास खर्च मिळणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

१३) उपांत्य फेरीतून अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आलेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी दिनांक १३ आणि १४ एप्रिल २०२४ यशवंत नाट्य मंदिर माटुंगा, मुंबई ४०००१६ येथे संपन्न होईल.

१४) नियम व अटी तसेच स्पर्धेच्या तारखांमध्ये फेरबदल करावयाचे अधिकार अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद राखून ठेवत आहे.

१५) नियम व अटींचे पालन सहभागी स्पर्धकांना करावेच लागेल.

१६) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल आणि तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक असेल.

१७) ह्या स्पर्धेत सादर होणाऱ्या सादरीकरणाचे संपूर्ण अथवा अंशतः चित्रीकरण करण्याचा आणि ते प्रसारित करण्याचा अधिकार नाट्य परिषदेने राखून ठेवलेला आहे.

१८) प्रवेश अर्ज प्रवेश मूल्यासह भरून पाठविण्याची अंतिम तारीख १० जानेवारी २०२४ सायं ६.०० वाजेपर्यंत असेल. यानंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत.
स्पर्धचे प्रवेश मूल्य खाली दिलेल्या बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीनेच भरणे आवश्यक आहे. (रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही ह्याची नोंद घ्यावी)

**नावः- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद**
**बँक खाते क्रमांक : 015310110003693**
**बँकेचे नाव : बँक ऑफ इंडिया**
**शाखा : शिवाजी पार्क**
**आयएफएससी कोड : BKID0000153.**
**प्रवेश मूल्य रुपये 100/-**

१९) स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रत्नागिरी येथे संपन्न होणाऱ्या समारोप सोहळयात संपन्न होईल.

**स्पर्धेची पारितोषिके :**
रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पारितोषिकांचे स्वरूप असेल.

**प्राथमिक फेरी – पारितोषिक**

| | |
|---|---|
| सर्वोत्कृष्ट पारितोषिक | :- रू. ५,०००/- |
| उत्कृष्ट पारितोषिक | :- रू. ३,०००/- |
| उत्तम पारितोषिक | :- रू. २,०००/- |
| उत्तेजनार्थ पारितोषिके | :- रू. १,५००/- |

----------------------------------------

**अंतिम फेरी – पारितोषिके**

| | |
|---|---|
| सर्वोत्कृष्ट पारितोषिक | :- रू. २५,०००/- |
| उत्कृष्ट पारितोषिक | :- रू. १५,०००/- |
| उत्तम पारितोषिक | :- रू. १०,०००/- |
| दोन उत्तेजनार्थ पारितोषिके | :- रू. ५,०००/- |

**स्पर्धेची वैशिष्ट्य :-**

- मराठी रंगभूमीच्या शिखर संघटनेने प्रथमच आयोजित केलेली भव्य स्पर्धा.
- स्पर्धेची प्राथमिक फेरी महाराष्ट्रातील २२ केंद्रांवर संपन्न होणार आहे.
- सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र.
- प्रथम विजेत्याचे शतकमहोत्सवी नाट्य संमेलनात सादरीकरण.
- नाट्य परिषदेच्या शाखांमध्ये सादरीकरणाची संधी.